# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६९१२३३
२५६०१२५८
२५६०१२५९

**शैक्षणिक विभाग**
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९८००७
वेबसाइट : **www.unipune.ac.in**
इ—मेल: **affiliation@pun.unipune.ac.in**

संदर्भ क्र. : सीए/१५४०

दिनांक : १८ऑगस्ट, २०१७

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य/संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी
संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,

विषय : महाविद्यालय/परिसंस्थेबाबतची माहिती अद्ययावत करणेबाबत...

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०१८—१९ साठी नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषयवाढ, तुकडीवाढ इत्यादींना मंजुरी देण्यासंबंधीचे अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सप्टेंबर, २०१७ मध्ये सुरु होत आहे.

या पत्राद्वारे आपणास विनंती करण्यात येते की, आपण आपल्या महाविद्यालये/परिसंस्थेबाबतची माहिती उदा. महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये चालु असणारे व बंद करण्यात आलेले अभ्यासक्रम, कायम संलग्नीकरण घेतलेले अभ्यासक्रम, प्रत्येक अभ्यासक्रमाची अनुदानित व विनाअनुदानित तुकडयांची संख्या, इत्यादींची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द (upload) केलेली आहे. ती तपासून त्यामध्ये काही बदल असल्यास ते आपल्या महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या Login ID मधून करण्यात यावे. जी माहिती बदलण्याची सुविधा उपलब्ध नाही अशी माहिती विद्यापीठाकडे दुरुस्तीसाठी पाठविण्यात यावी.

नवीन महाविद्यालय, नवीन विषय/तुकडी/विद्याशाखा/अभ्यासक्रमवाढ, इतर तसेच कायम संलग्नीकरण इत्यादी प्रस्तावांची छाननी करण्याकरिता उपरोक्त माहिती आवश्यक असल्याने ती अद्ययावत होणे आवश्यक आहे.

सदर माहिती अद्ययावत करण्याच्या दृष्टीने दि. २२ ऑगस्ट, २०१७ ते २९ ऑगस्ट, २०१७ या कालावधीमध्ये विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागामध्ये मार्गदर्शन करण्याचे/माहिती देण्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. आपण बी.सी.यु.डी. ऑनलाईन या संकेतस्थळावर ॲफिलिएशन या लिंकद्वारे आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेच्या Login ID मधून Login करुन माहिती अद्ययावत करुन घ्यावी. त्यानंतर कॉलेज प्रोफाईल पहाण्याकरिता या लिंकमध्ये उपलब्ध असलेले प्रपत्र download करुन त्याची प्रिंट काढून तपासावी. जी माहिती सुधारित करण्याची सोय महाविद्यालय/परिसंस्थेला दिलेली नाही त्याची नोंद प्रपत्रावर करुन सोबत दिलेल्या यादी नुसार आवश्यक कागदपत्रासोबत कार्यक्रम पत्रिकेत नमूद केलेल्या दिवशी विद्यापीठात सादर करावी. सदर माहिती भरणे सुलभ व्हावे यासाठी युझर मॅन्युअलची सोय कॉलेज प्रोफाईल पहाण्याकरिता या लिंकमध्ये देण्यात आलेली आहे.

सदर माहिती सप्टेंबर, २०१७ मध्ये सुरु होणा—या संलग्नीकरणाच्या प्रक्रियेसाठी आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या कार्यक्रमपत्रिकेप्रमाणे सादर करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

आपला,

१८/८/१७

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

सोबत : वरीलप्रमाणे

E:\Vaishnavi\2017-18\Information update.docx

**प्रपत्रासोबत आवश्यक कागदपत्रांची यादी व विशेष करुन तपासवायाच्या बाबी :**

१ कायम स्वरुपी मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक आहेत का? असल्यास विद्यापीठाचे मान्यता पत्र
२ संस्था अल्पसंख्यांक आहे का? असल्यास शासनाचे अल्पसंख्याक असल्याचे प्रमाणपत्र
३ महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे सुरुवातीचे मान्यता पत्र
४ महाविद्यालयाच्या तालुक्याचे ठिकाण व पीनकोड
५ महाविद्यालय युजीसी ॲक्ट नुसार 2(f) व 12(b) दर्जा प्राप्त आहे का? असल्यास त्याबाबतचे युजीसीचे पत्र
६ स्वायत्त महाविद्यालय/ स्वायत्त परिसंस्था आहे का? असल्याचे स्वायत्तता दिल्याचे पत्र
७ महाविद्यालय/परिसंस्थेतील मंजूर विद्याशाखा, अभ्यासक्रम,विषय,तुकडया व त्याची विद्यापीठाने वेळोवेळी दिलेली मान्यता पत्रे
८ कायम संलग्नीकरण मिळालेले अभ्यासक्रम/तुकडया व त्याची विद्यापीठाची मान्यता पत्रे
९ महाविद्यालय/परिसंस्थेत NAAC/NBA या प्राधिकरणाचे मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन (Accreditation/Reaccreditation) आहे का? असल्यास प्रमाणपत्राची प्रत तसेच अर्ज केला असल्यास त्याबाबतचा तपशील

## कार्यक्रमपत्रिका

| अनु क्र. | जिल्हा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर (सर्व महाविद्यालये व संशोधन केंद्रे/परिसंस्था) | २२/०८/२०१७ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| २ | नाशिक (सर्व महाविद्यालये व संशोधन केंद्रे/परिसंस्था) | २३/०८/२०१७ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| ३ | पुणे शहर (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालये व संशोधन केंद्रे/परिसंस्था) | २४/०८/२०१७<br>२६/०८/२०१७ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| ४ | पुणे ग्रामीण व पिंपरी चिंचवड (कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालये व संशोधन केंद्रे/परिसंस्था) | २८/०८/२०१७ | सकाळी ११.०० ते ५.०० |
| ५ | पुणे शहर, ग्रामीण व पिंपरी चिंचवड (अभियांत्रिकी, व्यवस्थापन शास्त्र, वास्तुशास्त्र औषधनिर्माणशास्त्र व संशोधन केंद्रे/परिसंस्था) | २९/०८/२०१७ | सकाळी ११.०० ते ५.०० |

आपला,

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

E:\Vaishnavi\2017-18\Information update.docx